# जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, ठाणे

क्र.सामान्य/कक्ष-१/टे-१/आस्था/सीआर नं.०४/२०१६ दिनांक:०७/०१/२०१७

वाचले:

१. मा.विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचेकडील पत्र क्र.मशा/आस्था/कार्या/इएसबी /कावि-१५१२/ २०१६, दिनांक २० डिसेंबर, २०१६ रोजीचे

२. या कार्यालयाकडील क्र.सामान्य/कक्ष-१/टे-१/आस्था/सीआर नं.४५/२०१६ दिनांक :०५/०१/२०१६

---

**विषय** :- दिनांक ०१/०१/१९८२ ते दिनांक ०१/०१/२०१५ या कालावधीत कार्यरत असलेल्या मंडळ अधिकारी संवर्गातील कर्मचाऱ्यांची अंतरिम ज्येष्ठता यादी प्रसिध्द करणेबाबत

**ज्ञापन** :-

शासन, महसूल व वन विभाग, परिपत्रक क्र.एसआरव्ही-२०१४/प्र.क्र.०२५/इ-७, दिनांक ३१ जानेवारी, २०१४ अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली, १९८२ मधील नियम ३ (क) व ४ (१) मधील तरतुदीनुसार २१ जून, १९८२ ते १ जानेवारी, २०१५ अखेरचे मंडळ अधिकारी संवर्गातील कर्मचा-यांची जिल्हा पातळीवरील अंतिम ज्येष्ठता सूची प्रसिध्द करण्यात आलेली आहे. नायब तहसिलदार संवर्गातील तदर्थ पदोन्नत्या नियमित करण्याबाबतच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने उक्त याद्यांची पडताळणी केली असता, त्यामध्ये सन १९९९ मध्ये व तदनंतर कार्यरत असलेल्या व मंडळ अधिकारी संवर्गातून पदोन्नत झालेल्या नायब तहसिलदारांची नांवे सदर ज्येष्ठता सूचीतून वगळण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. उपरोक्त कालावधीत कार्यरत असणा-या सर्व मंडळ अधिकारी संवर्गातील कर्मचा-यांची नावे सदरहू ज्येष्ठता सूचीमध्ये उचीत क्रमांकावर समाविष्ट केली असल्याची पुनश्च खातरजमा करुन दिनांक ०१.०१.२०१५ रोजीची मंडळ अधिकारी संवर्गाची ज्येष्ठता दर्शविणारी अंतरिम (तात्पुरती) ज्येष्ठता यादी प्रसिध्द करुन त्यावर सूचना व हरकती मागविण्यात करिता सदरची अंतिम यादी प्रसिध्द करण्यात येत आहे.

सदर यादी प्रसिध्द झालेपासून १५ दिवसांचे आत त्यावर हरकत / सूचना दाखल करता येतील. सदर हरकती / सुचना कार्यालय प्रमूखांच्या अभिप्रायासह सादर कराव्यात. तसेच मुदतीनंतर आलेल्या हरकती / सूचना विचारात घेतल्या जाणार नाहीत.

सर्व कार्यालय/ शाखा प्रमूख यांनी सदरची अंतरिम ज्येष्ठता यादी त्यांचे अधिपत्याखालील कार्यरत असलेल्या सर्व संबंधित अव्वल कारकून यांचे निदर्शनास आणावयाची आहे.

स्वाक्षरी/-

**(डॉ.महेंद्र कल्याणकर)**

**जिल्हाधिकारी ठाणे**

प्रत :- मा.विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई यांचेकडे माहितीसाठी सविनय सादर.

प्रत :- जिल्हाधिकारी पालघर

ठाणे जिल्हा सत्र न्यायालयासमोर, कोर्टनाका, ठाणे (पश्चिम) तालुका व जिल्हा ठाणे - ४००६०१.
संपर्क क्र. ०२२ - २५३४ ३६३६ /२५३४ १७३७ /३९ ▪ ई-मेल : collectorofficethane@gmail.com ▪ Website : www.thane.nic.in